# ज.ए.इ.ची प्राथमिक शाळा, सुभेदारवाडा कल्याण प.

## <u>वार्षिक अहवाल सन २०२०-२१</u>

कोरोना महामारी च्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षणात खंड पडू नये. संस्थेचा ज्ञान देण्याचा वसा अविरत सुरू राहावा.म्हणून सन २०२०-२१ यासाठी ऑनलाईन पद्धतीने शिक्षण देण्यात आले.”**मायक्रोसॉफ्ट टिम्स ॲप**” ची निवड करण्यात आली त्यासाठी सुभेदार वाडा विद्यासंकुला तील सर्व शिक्षकांना ऑनलाइन तीन प्रशिक्षण देण्यात आली.

सन २०१९-२० चे वार्षिक निकाल पत्रक वितरण २०२०-२१ चे पाठ्यपुस्तक वितरण व शालेय पोषण आहाराचे वितरण पूर्व नियोजनाप्रमाणे कोरोना संबंधित नियम पाळून करण्यात आले.आपल्या संस्कृतीची ओळख करून देणारे धार्मिक राष्ट्रीय सण - उत्सव ही ज्ञान मनोरंजनाचा खजिना लुटत साजरे केले गेले. मुख्याध्यापकांसह शाळेतील सर्व शिक्षकांनी एकेका सणाचे व्हिडिओ तयार करून आपले आधुनिक तंत्रज्ञाना तले कौशल्य दर्शविले व विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडली.

स्वातंत्र्य दिन, शिक्षक दिन, संस्था वर्धापन दिन हे पूर्ण संकुलातून एकत्रितरित्या ऑनलाइन पद्धतीने साजरे होत असताना सर्वांनाच विज्ञान-तंत्रज्ञानाचे किती महत्त्व आहे हे समजले.

शासकीय परिपत्रका प्रमाणे सर्व थोर व्यक्तींच्या जयंत्या विद्यार्थ्यांनी वेशभूषा साकरत माहिती व कार्यासह मांडली. ऑनलाइन तासाला आपल्या घरातील गणरायाचे दर्शन घडवत १२५ हून अधिक विद्यार्थ्यांनी आपले कलागुण दर्शवत सुभेदारवाड्याच्या गणेशोत्सवाची परंपरा कायम राखली.वार्षिक स्नेह- संमेलनाची उणीव भासू नये म्हणून विद्यार्थ्यांनी २६ ते ३० एप्रिल मध्ये विविध गुणदर्शन सोहळा संपन्न केला.

विविध ऑनलाईन स्पर्धेत पुढील विद्यार्थी यशस्वी झाले. रयतेचा वाली तर्फे राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत **कु.वेदिका पिल्लेवार** ने राज्यात प्रथम क्रमांक मिळवला.जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत तिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.नाट्य कला मंच तर्फे चित्रकला स्पर्धेत कु.**कल्पेश धामणकर**,**कु.भाग्यश्री जोगी**,**कु.संस्कृती पाटील, कु.मनस्वी अहिरराव** यांना उत्तेजनार्थ पारितोषिके मिळाली. राज्यस्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धेत **कु.आर्या एडेकर** ला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.अनुराग तर्फे एकपात्री अभिनय स्पर्धेत **कु.पूर्वा सोनवणे** हिला द्वितीय क्रमांक मिळाला. तर चिन्मय मिशन तर्फे भगवदगीता पठण स्पर्धेत **कु.प्रथमेश धोंगडे** याने तृतीय क्रमांक पटकावला.

महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा २०१९-२० मध्ये इयत्ता २ री चा **कु.विश्वजीत घोडके** ९८ /१०० गुण मिळवून राज्यात ४५ वा आला.तर इयत्ता ४ थी चा **कु.प्रारंभ जाधव** २४० /३०० गुण मिळवून राज्यात १३७ वा आला.

प्राथमिक शाळेच्या उभारणीत अमोल वाटा असलेले गुरुवर्य सी.एम. पुराणिक सर यांच्यावर कोरोना ने घाला घातला व सारे विद्यासंकुल शोकसागरात बुडाले. १६ एप्रिल२०२१ रोजी  त्यांना ऑनलाइन कार्यक्रमाद्वारे श्रद्धांजली वाहण्यात आली.

पालक व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने ऑनलाईन ज्ञानदान करणे शक्य झाले.परस्परांच्या ऋणनिर्देशात वर्षाची सांगता ३० एप्रिल२०२१ रोजी झाली.

धन्यवाद!!!

-मुख्याध्यापिका

श्रीम.नेहा नितीन कुलकर्णी